**श्री. जगदंबा प्रताप त्रिपाठी, भावसे (सेवानिवृत्त) यांना मुख्य वनसंरक्षक, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व प्रधान मुख्य वनसंरक्षक या श्रेणीतील पदोन्नतीचा मानीव दिनांक देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन आदेश क्र. आयएफएस-१०२३/प्र.क्र.११२/फ-७,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २६ जुलै, २०२४

<u>वाचा</u> :-

१) महसूल व वन विभाग शासन ज्ञापन क्र.आयएफएस-२०१०/७२५/प्र.क्र.३१८/फ-७, दिनांक १७ मार्च, २०११
२) महसूल व वन विभाग शासन ज्ञापन क्र.एएफओ-१३१९/प्र.क्र.१३२/फ-७, दिनांक १८जून, २०२४
३) श्री. जगदंबा प्रताप त्रिपाठी, भावसे यांचा दिनांक १८ जून, २०२४ रोजीचा अर्ज
४) महसूल व वन विभाग शासन आदेश क्र.एएफओ-११२४/प्र.क्र.६३/फ-७, दिनांक २७ जून, २०२४

**<u>शासन आदेश</u> :-**

श्री. जगदंबा प्रताप त्रिपाठी, भावसे हे उपवनसंरक्षक (कार्यआयोजना), औरंगाबाद या पदावर कार्यरत असताना वन विभागाचे नकाशे तयार करण्याच्या कामात झालेल्या अनियमिततेबाबत संदर्भाधीन शासन ज्ञापन दिनांक १७ मार्च, २०११ अन्वये त्यांचे विरुध्द अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६९ मधील नियम ८ अन्वये शिस्तभंग विषयक कारवाई सुरु करण्यात आली होती. श्री. त्रिपाठी यांच्या विरुध्द सुरु असलेली शिस्तभंग विषयक कार्यवाहीचे प्रकरण शासन मान्यतेने संपुष्ठात आणण्यात आले असून त्यानुषंगाने विभागाने संदर्भाधीन दिनांक १८ जून, २०२४ रोजी आदेश निर्गमित केले आहेत.

२. श्री. त्रिपाठी यांनी संदर्भाधीन दिनांक १८ जून, २०२४ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्याविरुध्द सुरु असलेले विभागीय चौकशी प्रकरण बंद करण्यात आले असल्याने त्यांना मुख्य वनसंरक्षक ते प्रधान मुख्य वनसंरक्षक या श्रेणीतील पदोन्नती पुर्वलक्षी प्रभावाने देण्याची विनंती केली आहे. श्री. त्रिपाठी हे दिनांक ३० जून, २०२४ रोजी शासन सेवेतुन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याची बाब विचारात घेता शासन आदेश दिनांक २७ जून, २०२४ अन्वये त्यांना प्रधान मुख्य वनसंरक्षक या श्रेणीमध्ये पदोन्नती देऊन त्यांची पदस्थापना प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), पुणे या पदावर करण्यात आली असुन सदर पदावरुन ते दिनांक ३० जून, २०२४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

३. श्री. त्रिपाठी, भावसे (सेवानिवृत्त) यांच्या विरुध्द सुरु असलेल्या शिस्तभंग विषयक कारवाईच्या अनुषंगाने त्यांच्या मुख्य वनसंरक्षक, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व प्रधान मुख्य वनसंरक्षक या श्रेणीतील पदोन्नती संदर्भातील दिनांक ०८.०१.२०२४ रोजीच्या विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशी सिलबंद लखोट्यात ठेवण्यात आल्या होत्या. सदर समितीच्या सिलबंद लखोट्यातील निष्कर्ष प्रधान सचिव (वने) यांच्या समक्ष उघडण्यात आले असून पदोन्नती समितीने श्री. त्रिपाठी यांना मुख्य वनसंरक्षक, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व प्रधान मुख्य वनसंरक्षक या श्रेणीतील पदोन्नतीकरिता पात्र ठरविले आहे. सदर पार्श्वभुमीवर त्यांना त्यांच्या निकटच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांचा पदोन्नतीचा दिनांक मानीव दिनांक म्हणून पूर्वलक्षी प्रभावाने खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे. श्री. त्रिपाठी यांना मानीव दिनांकापासून वेतन व भत्ते अनुज्ञेय राहतील.

| अ.क्र. | पदोन्नतीचे पद | वेतनश्रेणी | निकटतम अधिकाऱ्याचे नाव / पदोन्नतीने रुजू झाल्याचा दिनांक | पदोन्नतीच्या पदाचा मंजूर करण्यात येत असलेला मानीव दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य वनसंरक्षक | पे मॅट्रीक्स लेव्हल एस-१४ | श्री. महिप गुप्ता दि. १९.०७.२०११ | १९.०७.२०११ |
| २ | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक | पे मॅट्रीक्स लेव्हल एस-१५ | श्री. महिप गुप्ता दि. ०१.०४.२०१८ | ०१.०४.२०१८ |
| ३ | प्रधान मुख्य वनसंरक्षक | पे मॅट्रीक्स लेव्हल एस-१६ | श्री. महिप गुप्ता दि. ०१.१०.२०२२ | ०१.१०.२०२२ |

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०७२६१५१६५६९६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVIKIRAN SABAJI GOVEKAR

Digitally signed by RAVIKIRAN SABAJI GOVEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=223dbaf509e56a22dd8c9d33c199767837144d5824e7011745d9a521fdbedad3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B752370B557D0A3E58B4B069230BC54F6A13D04798D2EE7A3F1C7DCC5655271C, cn=RAVIKIRAN SABAJI GOVEKAR
Date: 2024.07.26 15:32:24 +05'30'

( डॉ. रविकिरण गोवेकर )
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत:

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव

६. प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहायक
७. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), पुणे,
९. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर
११. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर
१२. श्री. जगदंबा प्रताप त्रिपाठी, भावसे (सेवानिवृत्त), ३७, एम्प्रेस गार्डन व्ह्यु सोसायटी , सोपान बाग, पुणे-४११ ००१,
१३. अवर सचिव (फ-७ अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. सहाय्यक संचालक (भावसे लेखा), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. निवडनस्ती (फ-७ )